# ४ वर्षे पोक्सो (POCSO) कायद्याची :

## महाराष्ट्र राज्यातील पोक्सो (POCSO) कायद्याची अंमलबजावणी

### निष्कर्ष आणि शिफारशी



प्रवीण पाटकर - PHD
पूजा कंडुला - BDS, MSW

# ४ वर्षे पोक्सो (POCSO) कायद्याची

## महाराष्ट्र राज्यातील पोक्सो (POCSO) कायद्याची अंमलबजावणी निष्कर्ष आणि शिफारशी

### प्रस्तावना

**"४ वर्षे पोक्सो (POCSO) कायद्याची: महाराष्ट्र राज्यातील पोक्सो (POCSO) कायद्याची अंमलबजावणी"** हा राज्यस्तरावरील पहिला अभ्यास असून या अभ्यासात पोस्को (POCSO) म्हणजे "बाल लैंगिक शोषण प्रतिबंध कायदा (द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ्रॉम सेक्स्यूअल ऑफेन्सेस अॅक्ट, २०१२") प्रस्थापित करण्यासाठी त्यासंबंधीत कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना हा कायदा समजावून घेतांना आलेल्या अडचणी आणि वास्तवातील बाबी यावर प्रकाश टाकला आहे.

हा अभ्यास करण्यासाठी, आम्ही १७ जिल्हांचा दौरा केला आणि त्यासंबंधीत मौल्यवान माहिती, लोकांचा दृष्टीकोन व अनुभव मुलांच्या संरक्षणाशी निगडीत असलेल्या १४७ व्यक्ती/संस्था यांची आव्हानात्मक मते आणि माहिती गोळा केली ज्यात ७ वेगवेगळ्या विभागांत- पोलीस, बाल कल्याण समित्या, रुग्णालये, विशेष सरकारी वकील, जिल्हा बाल संरक्षण युनिट्स, बाल न्याय मंडळ (जुवेनील जस्टीस बोर्ड्स) आणि सामाजिक संस्था यांचा समावेश आहे.

हा रिपोर्ट आमच्या अंतिम संशोधन अहवालाचा संक्षिप्त सारांश आहे. ज्यामध्ये पोक्सो कायद्याच्या अंमलबजावणी संबंधीत निष्कर्ष आणि राज्याला केलेल्या शिफारशी यांच्यावर एक कटाक्ष टाकला आहे. आमचा विस्तारित संशोधन अहवाल वाचण्यासाठी आणि डाऊनलोड करण्यासाठी www.aarambhindia.org/research या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी आम्हाला info@aarambhindia.org वर लिहा.

## अभ्यासाचे उद्दीष्टे

१. पोक्सो (POCSO) कायद्यातील त्रुटी, विरोधाभास आणि पोक्सोकायद्याची शक्ती यांच्या आकलनात सुधारणा करणे .

२. लिखाण आणि पोक्सो कायद्याचा खरा अन्वयार्थ आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे त्यांच्यातील परस्पर संवाद प्राप्त करून त्या विषयीची समज वाढविणे.

३. पोक्सो (POCSO) च्या अंमलबजावणीसाठी जबाबदार राज्ययंत्रणा आणि बिगर राज्य यंत्रणा यांचे अस्तित्त्व तपासून त्यांचे प्रभावीपणासाठी परीक्षण करणे.

४. पोक्सो (POCSO) कायदा त्याचा कायदेशीर आणि प्रशासकीय वातावरणात कश्या पद्धतीने संवाद साधतो आहे हे समजावून घेणे.

५. कायद्याची अंमलबजावणी आणि त्याची उजळणी सशक्त करण्यासाठी शिफारशी करणे.

६. पोक्सो (POCSO) कायद्याअंतर्गत बालकांचे लैंगिक गुन्ह्यापासून अधिक चांगल्या प्रकारे संरक्षण करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे प्राप्त करणे.



## निवडलेले जिल्हे

अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बीड, धुळे, जळगाव, कोल्हापूर, लातूर, मुंबई, नागपूर, नंदुरबार, नाशिक, पुणे, रायगड, सातारा, सोलापूर, वर्धा.

## प्राथमिक माहिती संकलनात सहभागी झालेले व्यक्ती व संस्था

| **प्राथमिक माहिती संकलनात सहभागी झालेले व्यक्ती व संस्था** | **संख्या** |
|---|---|
| पोलीस | ६४ |
| बाल कल्याण समिती (सी.डब्ल्यू.सी) | १६ |
| रुग्णालये | १४ |
| विशेष सरकारी वकील | १८ |
| जिल्हा बाल संरक्षण युनिट्स (डी.सी.पी.यू) | १४ |
| बाल न्याय मंडळ - (जुवेनील जस्टीस बोर्ड्स जे.जे.बी) | ७ |
| नागरी सामाजिक संस्था (सी.एस.ओ / एन.जी.ओ) | १४ |

## गोळा केलेल्या प्राथमिक माहितीचा निष्कर्ष आणि वैयक्तिक भागधारकांसाठी केलेल्या शिफारशी

### पोलीस

**निष्कर्ष**

१. पोक्सो (POCSO) अंतर्गत पोलिसांच्या असणाऱ्या जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित, पोलिसांचा जागरूकतेचा स्कोर **५६%** इतका आहे.

२. बहुतेक पोलीस कर्मचाऱ्यांना **विविध कायद्यांचे बारकावे**, त्यांचे एकमेकांना पूरक असणाऱ्या बाबी आणि त्यांच्यामधील अंतर याबद्दलची स्पष्ट माहिती नाही.

३. पोक्सो (POCSO) कायदा अधोरेखित करतो की बालकांची केस हाताळतांना पोलीस कर्मचाऱ्यांनी बालकांना अनुकूल असणाऱ्या पद्धतींचा वापर करावा - बालकांसमोर पोलिसांनी युनिफॉर्म मध्ये स्वतःला सादर न करणे, बालकाला जर एखादी गरज असेल आणि संरक्षणाची आवश्यकता असेल तेव्हा त्यांच्यासाठी निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देणे, बालकाची ओळख उघड न करणे, आरोपी आणि त्यांच्या प्रतीनिधींपासून बालकाला नेहमी वेगळे ठेवणे, सी.डब्ल्यू.सी (बाल कल्याण समिती) ला अहवाल देणे, सर्व सेवा प्रदान करणाऱ्यांना चालना देणे, आणि त्यासाठी वेगवेगळ्या वेळेचा अवलंब करणे. **प्रतिसाद देणाऱ्यांकडून बालकांना अनुकूल असणाऱ्या पद्धती त्यांच्या प्रतिसादात आढळून आल्या नाहीत.**

४. सर्व अभिप्राय देणारे (६४) पोलीस लिखित दस्तावेजानुसार बालकाचे वय त्यांना असलेल्या माहितीनुसार १८ वर्षे सांगत होते, पण ते **प्रत्येक संवादात सांगत होते की १२ वर्षाखालील कोणत्याही व्यक्तीला ते अल्पवयीन समजतात**. त्यांनी हे पण नमूद केले की त्यांना असे वाटते की १२ वर्षांखालील बालकांसबधीत गुन्हे हे खरे असतात. त्यांनी हे मान्य केले की १२ वर्षांखालील बालकांसाठी अनुकूल अश्या मैत्रीपूर्णपद्धतींचा वापर मनापासून केला जातो.

५. **बहुसंख्य पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस उपनिरीक्षक नाहीत**. शहरी आणि ग्रामीण भागातील महिला पोलीस उपनिरीक्षक (पी.एस.आय) च्या उपलब्धतेत फरक होता. शहरी भागात, प्रत्येक पोलीस ठाण्यात बालकांच्या संदर्भातील गुन्ह्यांसाठी किमान १ समर्पित महिला पोलीस उपनिरीक्षक होती. ग्रामीण भागात, १५ पोलीस ठाण्यांमागे आणि काही ठिकाणी २५ पोलीस ठाण्यांमागे १ महिला पोलीस उपनिरीक्षक असणे विशेष नव्हते.

६. भेट दिलेल्या २० पोलीस ठाण्यांमध्ये दुपारी २ ते ५ या वेळेदरम्यान कोणताही अधिकारी (पोलीस निरीक्षक आणि पोलीस उपनिरीक्षक दर्जा असलेला) आढळून आला नाही.

७. **बहूतेक पोलिस ठाण्यांमध्ये स्वतंत्र कक्ष किंवा प्रतिक्षा क्षेत्र नव्हते** जी पिडीत बालकाला किंवा कुटुंबाला गोपनीयता पुरवू शकते**.** ग्रामीण भागातील ६४% पोलीस स्टेशनला स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष नव्हते.

८. बहुतांश **ग्रामीण पोलीस ठाण्यांमध्ये सुस्थितीत असलेली शौचालये नव्हती**.

९. बहूतेक जिल्ह्यांमध्ये, जेव्हा एखादी केस बोर्डवर येते, तेव्हा पोलीस बसने अथवा खाजगी वाहनाने पिडीत बालकाला जिल्हयाच्या ठिकाणी घेऊन जातात. काही केसमध्ये त्याच्या कुटुंबाला आपल्या स्वखर्चाने जिल्ह्याच्या मुख्यालयात बोलावले जाते. त्यामुळेच जेव्हा त्याच्या कुटुंबाला न्यायालयात बोलावले जाते तेव्हा प्रत्येकवेळी पालकांचा खर्च जास्त होतो. **काही वेळा पिडीत बालक आणि अपराधी यांना एकाच वाहनातून जिल्ह्याच्या मुख्यालयात आणले जाते.**

१०. **प्रत्येक पोलीस ठाण्यातील केवळ एक पोलिस अधिकाऱ्याला पोक्सो (POCSO) चे प्रशिक्षण दिले जाते**. जेव्हा हे पोलीस अधिकारी रजेवर असतात किंवा दुसऱ्या ठिकाणी बदली झाली तर दुसऱ्या पोलीस अधिकाऱ्याला कोणतीही माहिती नसतांना हे प्रकरण हाताळावे लागते.

११. अनेक अधिकाऱ्यांनी सांगितले की ऑडियो-व्हिडीओ माध्यमात **बालकांचा जबाब घेतांना ते हॅशड्रॉइड या अॅप्लीकेशनचा वापर करतात. हॅशड्रॉइड रेकॉर्डिंग केलेल्या डिजिटल फाईल ला एक युनिक आयडी (हॅश) देते. त्यामुळे व्हिडीओ स्वरूपातील पुराव्याबरोबर छेडछाड अथवा बदल करता येत नाही**. यातील काही पुरावे माननीय न्यायालयाने पुरावे म्हणून मान्य केले आहेत.

१२. **पोक्सो (POCSO) ला अनुसरून नसतांना, बरेच पोलीस स्टेशन हि केस 'आपल्या न्यायालयीन हद्दीत येत नाही' असे कारण सांगून तक्रार घेण्यास टाळाटाळ करतात**. तरीपण, प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्यांनी सांगितले की त्यांच्या पोलीस स्टेशनवर पोक्सो (POCSO) अंतर्गत येणारी प्रत्येक तक्रार नोंदविणे बंधनकारक आहे. वास्तवात हा एक विरोधाभास आहे.

१३. कायद्याने बंधनकारक केले नसले तरी, पोक्सो (POCSO) अंतर्गत येणाऱ्या तक्रारीसाठी **सर्व (१००%) पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद देतांना नमूद केले की, बालकाचा जबाब रेकॉर्ड करणे हे सेक्शन १६४ कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (CrPC) प्रमाणे असलेल्या महत्त्वाच्या ५ स्टेप पैकी एक आहे आणि त्याचे ते पालन करतात**.

१४. पोलीस कर्मचाऱ्यांची पोक्सो (POCSO) कायद्यानुसार पिडीत बालकांची वैद्यकीय तपासणी संदर्भात असलेली समज आणि पोक्सो (POCSO) मध्ये करण्यात आलेली तरतूद यामध्ये तफावत आढळून आली.

१५. अर्ध्याहून अधिक (६१%) पोलीस कर्मचार्यांनी प्रतिसाद देतांना सांगितले की, पोक्सो (POCSO) अंतर्गत गुन्हा नोंदविलेले प्रत्येक बालक हे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले गेले नाही.

१६. **३९%** पोलीस कर्मचार्यांनी प्रतिसाद देतांना सांगितले की, ते फक्त भारतीय दंड संहिता सेक्शन ३७५/३७६ अंतर्गत येणाऱ्या 'बलात्काराच्या' केसेस वैद्यकीय तपासणीसाठी पाठवतात. हा एक गंभीर गैरसमज आहे.

१७. पोलीस कर्मचारी जे या विषयावर मुख्यपणे काम करतात **त्यांना पोक्सो (POCSO) केसेस मध्ये वैद्यकीय तपासणीचे महत्त्व आणि सर्वांगीण हेतू याची समज आढळली नाही.**

१८. **अर्ध्याहून कमी (३९%) पोलीस कर्मचार्यांनी प्रतिसाद देतांना सांगितले की त्यांना प्रत्येक पोक्सो (POCSO) ची केस सी.डब्ल्यू.सी ला रिपोर्ट करावी लागते** आणि इतर १७% कर्मचाऱ्यांनी नमूद केले की त्यांनी प्रत्येक केस ही कोर्टात सादर करावी लागते.

१९. जरी बहूतांश पोलीस कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद देतांना सांगितले की सी.डब्ल्यू.सी सोबत काम करतांना त्यांना कोणतेही आव्हान नव्हते, **३८% कर्मचाऱ्यांनी सांगितले की त्यांनी हाताळलेल्या पोक्सो (POCSO) च्या केस मध्ये त्यांचा सी.डब्ल्यू.सी बरोबर कोणताही संवाद झाला नाही**.

२०. जिल्ह्यात बालकांसाठी उपलब्ध असलेल्या सेवासंदर्भात **७८% कर्मचाऱ्यांनी उपलब्ध असलेल्या सेवा या पुरेश्या आहेत व २२% कर्मचाऱ्यांनी उपलब्ध सेवा या पुरेश्या नाहीत असे सांगितले**.

२१. **८३% पोलीस त्यांना मनोधैर्य योजनेबाबत माहिती आहे असे सांगतात** आणि या योजनेंतर्गत त्यांची भूमिका ७८% पोलिसांना माहिती होती.

२२. **६१% पोलिसांनी प्रतिसाद देतांना सांगितले की बालकाचा जबाब हा पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला** जे पोक्सो (POCSO) कायद्याच्या तरतुदीच्या विरुद्ध आहे. **२** पोलिसांनी विशेष करून नमूद केले की त्यांनी बालकांचा जबाब पोलीस ठाण्यातील खाजगी खोलीत एकांतात घेतला.

२३. **पोक्सो (POCSO) अंतर्गत जबाब घेतांना महिला पोलीस अधिकारी हजर असणे आणि बालकांसमोर जबाबासाठी जातांना पोलीस गणवेश न घालता जाणे,** ह्या नियमाचे पालन आणि मैत्रीपूर्ण वातावरणात चौकशी केल्याची बहुतेक पोलिसांनी नमूद केले.

२४. ४५% पोलीस कर्मचार्यांनी प्रतिसाद देतांना सांगितले की, त्यांना पोक्सो (POCSO) अंतर्गत कोणतेही पिडीत दिव्यांग मुले आढळले नाहीत. हे काळजी करण्यासारखे लक्षण आहे कारण **दिव्यांग मुलांसोबत झालेले लैगिंक शोषण रिपोर्ट न होण्याची शक्यता जाणवते**.

२५. पोक्सो (POCSO) ने विस्तारित केलेल्या नियमानुसार, **फक्त २०% पोलिसांनी नमूद केले की बालकाचा जबाब हा स्वतःच मुळात एक पुरावा आहे**.

२६. बहूतांश (६६%) पोलिसांना वाटते की रिपोर्टिंग ची तरतूद ही अनिवार्य आहे. तरीपण, असे आढळून आले की ही तरतूद पोलिसांनी आणि राज्याने गंभीरपणे घेतली नाही आणि त्याची अंमलबजावणी झाली नाही.

**<u>शिफारशी</u>**

१. मुख्यपणे या संबधित काम करणाऱ्या पोलिसांची भूमिका आणि जबाबदारी याविषयीच्या त्यांच्या ज्ञानाचा स्तर; हा पोक्सो (POCSO) कायद्याच्या तरतुदी आणि त्याचा इतर कायद्यांशी असलेला परस्परसबंध यामध्ये तफावत आहे. त्यांच्या ज्ञानाचा स्तर हा मान्यताप्राप्त क्षमता विकास प्रशिक्षणाने वाढविणे आवश्यक आहे.

२. पोलिसांना पोक्सो (POCSO) अंतर्गत बालकांशी व्यवहार करतांना मैत्रीपूर्ण वातावरण ठेवण्यासाठी संवेदनशील, प्रशिक्षित आणि पर्यवेक्षण करणे गरजेचे आहे. पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांचे वैयक्तिक पूर्वग्रह आणि प्राधान्ये यांच्याकडे दुर्लक्ष करून, 18 वर्षे वयाखालील सर्व व्यक्तींसाठी हे लागू करणे आवश्यक आहे.

३. बहूतांश सामाजिक कायद्यात कोणत्याही स्तरावरील महिला आणि बालके यांना पोलीसस्टेशनसहित सर्व ठिकाणी संवेदनशीलपणे हाताळण्यासाठी तरतूद असावी. त्यासाठी प्रशिक्षित महिला पोलीस अधिकाऱ्यांची आवश्यकता आहे. प्रत्येक पोलीस स्टेशन मध्ये एक महिला पोलीस उपनिरीक्षक (पी.एस.आय) असावी अशी शिफारस आहे. **ग्रामीण आणि शहरी भागातील पोलीस स्टेशन मधील महिला पोलीस उपनिरीक्षक (पी.एस.आय) यांच्या संख्येत असणारी तफावत गंभीर आहे आणि त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.**

४. सर्व पोलीस ठाण्यांमध्ये एक सुसज्ज अतिरिक्त खोली असावी ज्यात पिडीत मुलांचे कायदेशीर पालक आणि सहाय्य करणाऱ्या व्यक्तींची गोपनीयता अबाधित राहील.

प्रत्येक पोलीस स्टेशनला एक किमान मुलभूत बांधकाम संरचना असावी, ज्यामध्ये किमान प्रसाधनगृह, वॉशरूम आणि जेवणासाठी खोली असावी.

५. आरोपी आणि पिडीत त्यांच्यात दृष्टी आणि ध्वनी विभेदन याची खात्री करण्यासाठी वेगवेगळ्या वाहनांतून नेणे आवश्यक आहे. तरीपण, असे आढळले की हे वास्तविकदृष्ट्या एकाच कारणासाठी दोन विशेष गाड्या करणे शक्य होत नाही. हे लक्षात घेता, त्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात खाजगी वाहन भाड्याने घेऊन दोघांना वेग-वेगळे नेण्यात यावे. ज्या पालकांसाठी जिल्हा मुख्यालय दूर आहे (विशेषकरून ग्रामीण भागातील पालक) त्यांना वाहनाची सुविधा करून द्यावी.

६. पोलीस अधिकारी/कर्मचारी ज्यांना बाह्य प्रशिक्षण/क्षमता विकास प्रशिक्षण दिले गेले आहे त्यांनी त्यांच्या पोलीस स्टेशनच्या इतर २ पोलीस कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. ते कर्मचारी प्रशिक्षित अधिकारी रजेवर गेल्यावर त्यांना पर्याय म्हणून काम करू शकतील.

७. पोक्सो (POCSO) अंतर्गत एफ. आय. आर. ची नोंदणी पोलीस ठाण्यात कर्मचारी आणि अधिकारी यांच्या विवेकबुद्धीवर सोडली जाऊ नये, कारण आधीच्या काळाप्रमाणे पोलीस कर्मचारी वर्ग एफ. आय. आर. नोंद करण्यासाठी इच्छुक नसतात. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोक्सो अंतर्गत प्रकरणाची नोंद झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोक्सो अंतर्गत प्रकरणाची नोंद झाल्यानंतर, तपास अधिकाऱ्यांनी सर्व आवश्यक/अत्यावश्यक पावले उचलावी याची दक्षता घ्यावी. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून ह्या कामाचे पर्यवेक्षण करावे हा महत्त्वाचा मुद्दा आहे.

८. सर्व पोलीस स्टेशन्स हे कॉम्पुटर चे हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि इंटरनेट हाताळण्यासाठी तंत्रज्ञानाने सुसज्ज झाले पाहिजेत.

९. पोक्सो (POCSO) च्या केसेस पोलीस स्टेशन स्तरावर हाताळताना, अनेक तफावती/अडचणी आढळतात ज्यामध्ये फिल्डवर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याला या कायद्याची असणारी माहिती, पोक्सो (POCSO) अंतर्गत असणारी त्यांची भूमिका आणि जबाबदारी यांची जाणीव, या कायद्यातील तरतुदी विशद करतांना त्यांना असलेला वाव आणि त्याचे स्वतः चे मत वापरणे. पोक्सो (POCSO) अंतर्गत करण्यात येणाऱ्या वैद्यकीय तपासणी ही मर्यादित ठरवली गेली आहे आणि ती लैंगिक शोषण व शारीरिक जखम यांची नोंद घेण्यासाठीच करण्यात येते. त्यामुळेच जेथे तक्रारीत लैंगिक शोषणाची नोंद नसते त्यावेळी पोलिसांना वैद्यकीय तपासणी करणे आवश्यक आहे असे वाटत नाही. **प्रथमदर्शनी पोलिसांना स्वतः चे**

**मत वापरण्याचा अधिकार देऊ नये, दुसरे, मुळातच पिडीत व्यक्तीला मानसिक त्रास झालेला असतो, फक्त शारीरिक तपासणी केल्याने मानसिक त्रास रेकॉर्डवर आणू शकत नाही.** पोक्सो (POCSO) कायद्याच्या तरतुदी योग्यरीतीने बदलवाव्या व त्यामध्ये पिडीत व्यक्तीला गुन्ह्यामुळे झालेला मानसिक त्रास व परिणाम यांचे मुल्यांकन करण्यासाठी मानसिक चाचणी घेण्याची तरतूद असावी.

१०. दिव्यांग बालकांविरोधात लैंगिक शोषण झालेल्या गुन्ह्यांची नोंदणी होत नाही आणि यासंदर्भातील गुन्हे उघडकीस येत नाही ही स्थिती गंभीर आहे.

११. पोलीस आणि त्यासंदर्भात काम करणारे मुख्य कर्मचारी जे पोक्सो (POCSO) नुसार पिडीत असलेल्या व्यक्तीच्या संपर्कात येतात त्यांना पोक्सो (POCSO) नुसार असणाऱ्या त्यांच्या जबाबदारीची जाणीव असावी. सद्य परिस्थितीनुसार पोक्सो (POCSO) नुसार असलेल्या जबाबदारीविषयी पोलिसांचे वेगवेगळे मते व वेगवेगळी समज आहे.

## विशेष सरकारी वकील

**निष्कर्ष**

१. वकिलांचा पोक्सो (POCSO) अंतर्गत असणाऱ्या त्यांच्या विशिष्ट जबाबदारींविषयी आणि कायद्या विषयीच्या माहितीचा सामान्य स्कोअर हा **४८%** आढळला.

२. पोक्सो (POCSO) कायदा लागू होण्याआधी बहुतांश (८३%) वकिलांनी बाल लैंगिक शोषणाच्या केस वर काम केले होते.

३. पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत असणाऱ्या तरतुदीनुसार, बालकाचे वय १८ वर्षापर्यंत निर्धारित केले आहे, **तरीसुद्धा जिल्हा न्यायालयात फक्त १२ वर्ष व त्याखालील बालकांसाठी मैत्रीपूर्ण वातावरण व पद्धतींचा वापर केल्याचे नमूद केले गेले.**

४. जरी **बहुसंख्य (८३%) वकिलांनी नमूद केले की न्यायालयातील काही कोर्टरूम्स ह्या पोक्सो(POCSO) केसेस साठी राखीव आहेत,** हे कोर्टरूम्स फक्त पोक्सो (POCSO) साठी समर्पित नाही ते इतर महिलांच्या केसेस साठी सुद्धा काम करतात.

५. काही तुरळक अपवाद वगळता, सर्व **विशेष न्यायालयांमध्ये पिडीत बालकांसाठी स्वतंत्र प्रतीक्षा कक्ष आढळले नाही**. पिडीत **बालक** हा वकिलांच्या कार्यालयात किंवा न्यायालयाच्या दालनाबाहेर असतो त्यामुळे आरोपी किंवा त्यांचा सहकारी यांच्याशी पिडीत बालकाचा संपर्क होऊन धोका उत्पन्न होऊ शकतो.

६. **बहुतांश (७१%) जिल्हा न्यायालयात आरोपी आणि पिडीत यांना विलग करण्यासाठी कॅमेरा, पडदे आणि विभाजक आहेत**. तरीपण ज्या सर्व न्यायालयीन कक्षांचा वापर विशेष **पोक्सो** (POCSO) न्यायालयासाठी करण्यात येतो तेथे ह्या सुविधा उपलब्ध नाहीत.

७. वर दिलेले वास्तव हे **बालकांप्रती असलेल्या मैत्रीपूर्ण वातावरण आणि संरचनेचा अभाव आणि त्यांना दिलेल्या सुविधा या काळजी दर्शविणाऱ्या आणि सामान्य दृष्टीकोनाच्या आहेत** ज्या त्यांच्या गोपनीयता आणि मान यांना बाधित करतात.

८. जवळपास **निम्म्याहून (५३%) अधिक न्यायालयात पोक्सो (POCSO) करिता विशेष सरकारी वकील नाही.**

९. निम्म्या (५०%) वकिलांना असे आढळले की विशेष पोक्सो (POCSO) न्यायालय हे केसेस लवकर मार्गी लागतात.

१०. पोक्सो (POCSO) ने बालकांची ओळख उघड न करणे आणि त्यांना मैत्रीच्या वातावरण यासाठी निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांची समज आणि स्पष्टता याबद्दल अभाव आहे. त्यांनी दिलेल्या प्रतिसादात याची काही उदाहरणे आढळतात:

- १६४ कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (CrPC) प्रमाणे बालकाचा जबाब नोंदविण्यासाठी विरोधी पक्षाचे वकील तेथे हजर असणे.
- आरोपी अथवा त्याचा साथीदार याला पिडीत व्यक्तीशी संवाद साधणे अथवा भेटण्याची मुभा देणे.
- विरोधी पक्षाच्या वकीलाने बालकास थेट प्रश्न विचारण्याची मुभा देणे.

११. वकीलांनी केस संपण्यासाठी लागणाऱ्या विलंबासाठी **पोलीस आणि डॉक्टर यांना दोष दिला कारण पोलीस आणि डॉक्टर त्यांचा अहवाल उशिरा देतात**.

१२. जर पिडीत हा अगदीच अल्पवयीन असेल तर त्यांची भाषा समजण्यास वकिलांना अडचण येते असे त्यांचे म्हणणे आहे.

१३. बहुतांश वकील हे अनिवार्य अहवाल (Mandatory Reporting) देण्याच्या पक्षात आहेत.

**<u>शिफारशी</u>**

१. राज्याने पोक्सो (POCSO) च्या केसेस हाताळण्याऱ्या वकिलांची संवेदनशीलता जागरूक करणारे मान्यताप्राप्त प्रशिक्षण द्यावे.

२. पोक्सो (POCSO) साठी आवशयक यंत्रणा आणि सुविधा नसल्यामुळे कायद्याच्या नियमांचे उल्लघन होत आहे. राज्याने किमानपक्षी त्यासाठी लागणारी बांधकाम संरचना, जिल्हा न्यायालयात पोक्सो (POCSO) साठी लागणारी यंत्रणा आणि सुविधा पुरवाव्यात.

३. विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती जलद गतीने व्हावी.

४. या कामासाठी भाग घेतलेले इतर भागधारक आणि कर्मचारी यांच्याप्रमाणेच पोक्सो (POCSO) कायद्याच्या तरतुदीनुसार बालकांप्रती अपेक्षित असलेली मैत्रीपूर्ण भावना यांची समज वकिलांमध्ये कमी आढळली. बालकांप्रती असणारी मैत्रीपूर्ण भावना व पोक्सो (POCSO) मध्ये असणारी त्यासाठीची प्रक्रिया आणि सराव यांना समजून त्याला मुख्य प्रवाहात आणण्याकरिता वकिलांसाठी प्रोटोकॉल, एस.ओ.पी (Standard Operating Procedures), चेकलिस्ट्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि ऑनलाईन कोर्सेस उपलब्ध करून द्यावे.

## बाल न्याय मंडळ
## (Juvenile Justice Board: जे.जे.बी)

**<u>निष्कर्ष</u>**

१. **सर्व जे.जे.बी** मध्ये **पूर्णवेळ महिला न्यायाधिश नियुक्त** आहे. जे.जे.बी हे निरीक्षण गृहाच्या आवारात आहेत, त्यांना त्यातली एक खोली निर्देशित केली आहे. तरी, पोक्सोनुसार (POCSO) पीडित मुलांच्या समुपदेशन व प्रतिक्षेसाठी कोणतीही स्वतंत्र खोली नाही.

२. जे.जे.बी कडे केसेस नोंद करण्यासाठी आणि डीजीटायजेशन यासाठी सहाय्यक कर्मचारीवर्ग आहे.

३. **कोणत्याही जे.जे.बी ने पोक्सो** (POCSO) **अंतर्गत आरोपी बालक** १२ वर्षाखालील असल्याचे नमूद केले नाही.

४. बहुतांश जे.जे.बी ची अशी समज आहे की बालकांच्या लैंगिक गुन्ह्यांची ची वाढ ही लैंगिक जिज्ञासेतून आणि किशोरवयीन मुलांवर इंटरनेट आणि इतर माध्यमाच्या प्रभावाने व त्यांच्या प्रयोगशीलतेने झाली आहे.

५. **जे.जे.बी ने असे नमूद केले आहे की त्यांनी प्रत्येक मुलाचा सामाजिक संशोधन अहवालासाठी सर्वेक्षण केले आहे** ज्यामुळे त्यांना बालकांना पूर्णपणे समजण्यास मदत होईल आणि बालकांना ज्यामध्ये रस आहे त्यासाठी त्यांना निर्णय घेणे सोपे जाईल. त्यांची सजगता ही 'प्रेरणा आणि राज्य सरकार' यांच्यामध्ये असलेल्या केससंदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार आहे. (क्रिमीनल रिट पिटीशन १६९४ - २००३)

६. **सर्व जे.जे.बीं ना माहिती आहे की पिडीत बालकाला न्यायालयात वारंवार हजर करणे अयोग्य आहे आणि त्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे.** हे एक चांगला सराव दर्शविते पण त्याबरोबरच पोक्सो (POCSO) बद्दल स्पष्टतेचा अभाव दर्शविते कारण **जे.जे.बी** चे न्यायाधीश हे फक्त पिडीत मुलांविषयी नियम सांगत होते पण जे.जे.बी मध्ये विधी संघर्षित बालकांनाबरोबर सुद्धा मैत्रीपूर्ण व्यवहार करणे गरजेचे आहे.

७. सर्व जे.जे.बीं ने नमूद केले की **गुन्हा झाल्यास तपासासाठी अत्यंत महत्वाची** पायरी **'ओळखपरेड'** हे **निरीक्षण गृहाच्या परिसरात** होते. त्यामुळे विधी संघर्षित बालकांना जाण्या-

येण्यामुळे होणारा शारीरिक ताण कमी होतो. तरी, तेथे प्रश्न उपस्थित राहतो की विधी संघर्षित बालक आणि पिडीत बालक यांना समोरासमोर आणावे की नाही.

८. सर्व जे.जे.बीं ने मान्य केले की **प्राथमिकदृष्ट्या जरी एखाद्या बालकाने गुन्हा केला असेल तरी ते त्या बालकाला जामीन मंजूर करतात.** ते याची खात्री करतात की जर बालकाला परत गेल्यानंतर धोका असेल अश्या परिस्थिती सोडून बाकी सर्व परिस्थितीत जामीन मंजूर केला जातो. **जामीन हा २४ तासांच्या आत मंजूर केला जातो.**

९. जे.जे.बीं ने नमूद केले आहे की जर एखादा बालक पोक्सो (POCSO) अंतर्गत दोषी असेल तेव्हा मुक्त सामाजिक समुदाय सारख्या रचनात्मक ऑर्डरचा उपयोग करता येतो परंतु अशा प्लेसमेंटवर देखरेख करण्यासाठी मानवी संसाधनांची गंभीर कमतरता आहे. जेजे यंत्रणांमध्ये गरजा आणि तरतुदी यामध्ये तफावत आहे.

१०. जे.जे.बी ने आर्थिक संसाधनांची कमतरता आहे असे नमूद केले आहे.

११. सर्व जे.जे.बी ने मान्य केले की त्यांच्या जिल्ह्यात निरीक्षण गृहासाठी पुरेशी बांधकाम संरचना आहे पण तेथे किमान सुविधांचा आणि मानव संसाधनाचा अभाव आहे. त्यामुळे बालकांच्या पुनर्वसनावर विपरीत परिणाम होतो. त्यांनी खेद व्यक्त केला की त्यांच्या जिल्ह्यात शैक्षणिक आणि व्यावसाईक प्रशिक्षणाची गंभीर परिस्थिती आहे. सर्व जे.जे.बी ना वाटते की **निरीक्षण गृहांची गुणवत्ता वाढावी**. **ज्या जिल्ह्यामध्ये मुलींसाठी निरीक्षण गृह नसेल त्यांना शेजारच्या जिल्ह्यामध्ये ठेवावे.** विधी संघर्षित बालकांचे पुनर्वसन करण्यासाठी कायद्यात योग्य तरतुदी व्हाव्यात.

**<u>शिफारशी</u>**

१. जे.जे.बी ला फक्त महिला न्यायाधिश नियुक्त न करता सम-समान पुरुष व स्त्री न्यायाधीश नियुक्त केले जाऊ शकतात.

२. पोक्सो (POCSO) च्या अंतर्गत यंत्रणा बळकट करताना पोक्सो (POCSO) च्या तरतुदीनुसार विधी संघर्षित किशोरवयीन मुलांच्या गरजा आणि अधिकारांकडे दुर्लक्ष करू नये. विधी संघर्षित बालक जे.जे. कायद्यानुसार व मानवीय अधिकारानुसार योग्य व्यवहारास पात्र आहे.

३. विधी संघर्षित बालक, त्यांचे प्रतिनिधी आणि पिडीत बालक त्यांच्यात दृष्टी आणि ध्वनी विभेदन करण्यासाठी उत्तम सुविधा पुरविली पाहिजे.

४. निरीक्षण गृहांमध्ये दिल्या गेलेल्या सुविधा या किमान गुणवत्ता आणि आवश्यक संख्येप्रमाणे असाव्यात.

५. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलींसाठी निरीक्षण गृह उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

६. विधी संघर्षित बालकाचे पुनर्वसन करण्यासाठी कायद्यात योग्य त्या तरतुदी असाव्यात.

# बाल कल्याण समिती
# (Child Welfare Committee: सी.डब्ल्यू.सी)

**निष्कर्ष**

१. **सी.डब्ल्यू.सीची पोक्सो (POCSO) अंतर्गत असणारी भूमिका आणि जबाबदाऱ्या यासंबधित जागरुकतेचा सरासरी स्कोअर ४३% आहे. हे निराशाजनक आहे.**

२. **बहुतांश (७५%) सी.डब्ल्यू.सी मध्ये ५ सदस्यांची पूर्ण टीम नव्हती.** काही ठिकाणी सदस्य अनुपस्थित होते तर बऱ्याच ठिकाणी सीडब्ल्यूसीचे काम फक्त दोन सदस्य पाहत होते.

३. सी.डब्ल्यू.सीची रचना करतांना तरतूद केली गेली की विषम संख्येमध्ये सदस्य नियुक्त केले गेले जेणेकरून सदस्यांमध्ये वेगवेगळे मते असतील तर बहुसंख्य पाठींब्याने मुख्य निर्णय घेणे सोपे होईल. एका जिल्ह्यात असे आढळले की दोन सदस्य हे प्रत्येक मिटिंगला असायचे आणि तेच प्रत्येकवेळी सभेला हजेरी लावत, जवळपास नेहमीच त्या दोघांमध्ये मतभेद होते. दोन सीडब्ल्यूसी मध्ये कोणीही अध्यक्ष नव्हते. **पोक्सो (POCSO) ने निश्चितपणे कामाचा भार आणि जबाबदारी टाकल्याने सीडब्ल्यूसीची तुटीची रचना अधिकच गंभीर झाली. सीडब्ल्यूसी मध्ये नियुक्त केल्या गेलेल्या पूर्ण कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीने आणि सीडब्ल्यूसीचा अपुऱ्या मनुष्याबळासह असलेला सद्य कामाचा व्याप यामुळे सीडब्ल्यूसीची कायदेशीर वैधता आणि त्यांनी जारी केलेल्या ऑर्डर्स आणि निर्णय यांच्यावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

४. ही एक चांगली बाब आहे की सीडब्ल्यूसी च्या कार्यालयाबाहेर सी.डब्ल्यू.सी च्या सदस्यांचे नाव, फोन क्रमांक, समितीच्या बैठकीची वेळ आणि बैठकीचे दिवस यांची माहिती असलेला फलक लावलेला आहे. तरीपण, **बहुतांश** सी.डब्ल्यू.सी **(८८%) हे त्यांचे काम एक किंवा दोन तासांच्या विलंबाने चालू करतात. येथे बालक, त्यांचे पालक, इतर त्यासंबधीत असलेल्या व्यक्ती यांची बैठक व्यवस्था नसल्याने** सीडब्ल्यूसीचे काम केव्हा सुरु होते याची वाट पाहत बाहेर ताटकळत असल्याने त्यांची गैरसोय होते.

५. बहुतांश **(७७%)** सी.डब्ल्यू.सी मध्ये पिडीत **बालकासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था नसल्याने** बालकांविषयी **गोपनीयता** बाळगण्याच्या नियमांचे उल्लंघन होते.

६. ज्या जिल्ह्यांमध्ये **सी.डब्ल्यू.सी, बाल न्याय मंडळ (जे.जे.बी) आणि जिल्हा बाल संरक्षण युनिट (डी.सी.पी.यु) हे एकाच परिसरात** होते **त्या ठिकाणी** त्यांच्या मध्ये समन्वय चांगले दिसून आले.

७. बहुतांश (*९४%*) सी.डब्ल्यू.सी नी दावा केला की त्यांना पोक्सो (POCSO) कायद्यावर प्रशिक्षण मिळाले आहे पण त्यातून **(५०%)** सी.डब्ल्यू.सी **नी सांगितले की पोक्सो (POCSO) केसेस हाताळण्यासाठी ते प्रशिक्षण पुरेसे नव्हते.**

८. एक तृतीयांश (३१%) सी.डब्ल्यू.सी ने नमूद केले की पोलीस बाल लैंगिक अपराधांची प्रत्येक केस नियमानुसार सी.डब्ल्यू.सी ला रिपोर्ट करतात. **४४% सी.डब्ल्यू.सी नी सांगितले की** समन्स **पाठविल्यानंतरही पोलीस त्यांच्या समोर हजार होत नाहीत**.

९. बहुतांश **(६९%) सी.डब्ल्यू.सी ची समजूत अशी आहे की पोक्सो (POCSO) नुसार पिडीत बालकाला त्यांच्यासमोर हजर' करणे आवश्यक आहे.** त्यांची अशी तक्रार आहे की बहुतांश जिल्ह्यातील पोलीस हे **पोक्सो (POCSO)** केस च्या प्रत्येक **पिडीत** बालकाला त्यांच्यासमोर हजर करत नाही.

१०. जवळपास सर्वच (९४%) सी.डब्ल्यू.सी नी सांगितले की पोक्सो (POCSO) नुसार **त्यांच्यावर अतिरिक्त जबाबदारी आहे** पण या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय सोय आणि आर्थिक बजेटची पुर्तता केली गेलेली नाही.

११. जवळपास सर्वच (**९४%) सी.डब्ल्यू.सी ला माहिती नव्हते की पोक्सो (POCSO) नुसार त्यांना पिडीत** बालकासाठी **एक सहाय्य व्यक्ती नियुक्त करायचा आहे.** ही तरतूद **महत्त्वपूर्ण आहे. पण बहुतांश** सी.डब्ल्यू.सी नी या तरतुदी चा वापर केला नसल्याचे आढळले.

१२. सी.डब्ल्यू.सी ने नमूद केले की त्यांच्या जिल्ह्याच्या ठिकाणी **लैंगिक शोषणाच्या पिडीत** बालकांसाठी **निवाऱ्याची सोय, वैद्यकीय आणि कायदेशीर सेवांची उपलब्धता आहे**. तरीपण वकील, दुभाषी, भाषांतरकार आणि स्पेशल एजुकेटर यांची **उपलब्धता** खूप कमी आहे.

१३. **सी.डब्ल्यू.सी** आणि **त्या**संबंधीत **इतर बहुसंख्य भागधारक यांच्यामध्ये संवाद आणि सहयोग नसणे ही गंभीर बाब आहे.** ही परिस्थिती पोक्सो (POCSO) अंतर्गत **लैंगिक शोषणाच्या पिडीत** बालकावर परिणाम करते.

**<u>शिफारशी</u>**

१. सी.डब्ल्यू.सी च्या रचनेमध्ये तातडीने बदल घडवून आणण्याची गरज आहे, जेणेकरून सी.डब्ल्यू.सी सदस्यांची नेमणूक वेळेवर होईल आणि ४५ दिवसांपेक्षा जास्त कोणतेही पद रिक्त राहणार नाही.

२. सी.डब्ल्यू.सीच्या सदस्यांचे कामाच्या गुणवत्तेचे पर्यवेक्षण त्यांची कामावरील हजेरी, प्रशिक्षणातील सहभाग आणि सी.डब्ल्यू.सीच्या कार्यातील सक्रीय सहभाग या निकषांवर झाले पाहिजे.

३. एका सहाय्य व्यक्तीच्या नेमणुकीची महत्त्वपूर्ण तरतूद बहूतांश सी.डब्ल्यू.सी ने वापरली नाही. जेथे योग्य व्यक्ती उपलब्ध नाही किंवा कोणीही व्यक्ती सहाय्य व्यक्तीचे काम करण्यास तयार होत नसेल, तेव्हा भारत सरकारच्या चाईल्डलाईन कार्यक्रमातील व्यक्तींची निवड सी.डब्ल्यू.सी ने सहाय्य व्यक्ती म्हणून करावी अशी शिफारस आहे.

४. सी.डब्ल्यू.सी ने स्वतः पुढाकार घेऊन अश्या संस्थांची यादी बनवावी की ज्यांना ते सहाय्य संस्था म्हणून नियुक्त करू शकतात.

५. पोक्सो (POCSO) नियमानुसार, सी.डब्ल्यू.सी ने सहाय्य व्यक्तीच्या नियुक्तीसाठी आदेश जारी करणे आवश्यक आहे. सी.डब्ल्यू.सी ला या नियमाची माहिती करून देणे आवश्यक आहे. सी.डब्ल्यू.सी ला याची जाणीव करून देणे आवश्यक आहे की जर नागरी सामाजिक संस्थांकडे (NGO) बालकाला न्यायालयात हजर करण्याचा आदेश आहे तेव्हा पिडीत बालकाला न्यायालयात आधार देणे हे त्यांच्या संस्थेचे काम आहे. सी.डब्ल्यू.सी ला हे माहिती पाहिजे की जर त्यांनी सहाय्य व्यक्तीची नियुक्ती केली तर, त्याची माहिती पोलिसांनी माननीय न्यायालयाला कळविणे अनिवार्य आहे. सी.डब्ल्यू.सी ने पोक्सो (POCSO) अंतर्गत असणाऱ्या महत्त्वाच्या तरतुदींचा वापर जास्तीतजास्त करावा.

६. जेव्हा सदस्यांची उपस्थिती नसेल तेव्हा सी.डब्ल्यू.सी ने घेतलेले निर्णय आणि दिलेले आदेश यांच्यावर जास्तीतजास्त स्पष्टता आणण्यासाठी जे.जे कायद्याअंतर्गत (JJ Act) नियमांचे योग्य पद्धतीने विस्तरण आणि विशद झाले पाहिजेत.

७. सी.डब्ल्यू.सी च्या प्रशिक्षणात उच्च जबाबदारी असणे आवश्यक आहे.

८. पोक्सो (POCSO) आणि जे.जे कायदा (JJ Act) यांच्या मध्ये असणारे संयोजन समजून घेण्यासाठी सर्वांगीण आणि मान्यताप्राप्त प्रशिक्षण सी.डब्ल्यू.सी ला देणे गरजेचे आहे.

९. सी.डब्ल्यू.सी ने पोक्सो(POCSOA) केसेस हाताळतांना, बालकांच्या चांगल्या संरक्षणासाठी विविध तज्ञ सेवा प्रदातांचा वापर करावा जेणेकरून त्यांचे ज्ञान आणि हितकारक दृष्टीकोनाचा पुरेपूर वापर करता येईल.

१०. सी.डब्ल्यू.सी आणि त्यासंबधीत असलेले इतर भागधारक यांच्या कामाचे तातडीने पर्यवेक्षण व्हावे.

# जिल्हा बाल संरक्षण युनिट्स
# (District Child Protection Units: डी. सी. पी. यूस )

**<u>निष्कर्ष</u>**

१. **डी.सी.पी.यूस च्या जागरुकतेचा सरासरी** स्कोअर हा **३४% होता (प्रश्न केवळ** पोक्सोच्या **अंतर्गत त्यांच्या जबाबदाऱ्यांच्या जागरुकतेपर्यंतच मर्यादित होते). सध्याच्या जागरूकतेचा स्तर खूपच निराशाजनक आहे** कारण, **या तथ्यांच्या पृष्ठभूमीवर डी.सी.पी.यू** हे पोक्सो **च्या अंतर्गत विविध कर्तव्यधारक यांच्यात उत्तम समन्वय साधण्यासाठी एक महत्त्वाची संस्था आहे.**

२. **सर्व जिल्ह्यांमधील डी.सी.पी.यूस मध्ये कर्मचाऱ्यांची कमतरता होती.** एकात्मिक बाल संरक्षण योजनेखाली (आई.सी.पी.एस) नमुद केल्याप्रमाणे कोणत्याही जिल्हा बाल संरक्षण केंद्रात १३ सदस्यांची पूर्ण टीम नव्हती.

३. **डी.सी.पी.यूस** मध्ये पुरेश्या मानवी संसाधनांचा अभाव होता आणि त्याच्यामुळे समस्त कामकाजासाठी गंभीर आव्हाने उभी होती. ते बहुतांश विभाग, योजना आणि कायदे यांसारख्या अनेक विभागाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पुरेसा वेळ देण्यास असमर्थ ठरत होते.

४. प्रत्येक जिल्ह्याच्या विशाल भौगोलिक क्षेत्राकडे पाहता, एका डी.सी.पी.यू च्या अधिकारक्षेत्रासाठी ते एक आव्हानच होते.

५. **डी.सी.पी.यूस** च्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने होते आणि **कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर दिले जात नाही.** ह्यामुळे बहुतेक सदस्य निराश असल्याचे नमूद केले गेले.

६. सुमारे ५ जिल्ह्यातील **डी.सी.पी.यूस**, सी.डब्ल्यू.सी आणि जे.जे.बी. यांची कार्यालये एकाच ठिकाणी होती. अशा परिस्थितीत असे दिसून आले आहे की, या तिन्ही प्रणाली एकाच वेळी चांगले कार्य करतात. दुसरीकडे, बहुतेक जिल्ह्यांतील डी.सी.पी.यू (८) आणि डी.डब्ल्यू.सी.डी ची कार्यालये एकाच परिसरात कार्यरत होती. **अशा परिस्थितीत, डी.डब्ल्यू.सी.डी ने** अधिक **कामाचा बोजा दिल्याने त्यांच्या कामाच्या व्यतिरिक्त इतर कामांच्या ताणामुळे डी.सी.पी.यू मध्ये स्वायत्ततेची कमतरता असल्यासारखे दिसत होते.**

७. जेथे **डी.सी.पी.यूस** इतर भागधारकांशी चांगले नातेसंबंध व अनुबंध जोडण्याबाबत यशस्वी ठरले आहेत, तेथे पोक्सोच्या अंतर्गत असलेले प्रकरण तुलनेने चांगले हाताळले गेले आहेत.

८. **डी.सी.पी.यूस अस्तित्वाविषयी इतर** भाग**धारकांमध्ये विशेषतः वैद्यकीय व्यावसायिक, पोलिस आणि न्यायालये यांच्यामध्ये कोणतीही जागरूकता नाही**. मुलाखतींमधील फक्त ६८% व्यक्तींना त्यांच्या अस्तित्वाविषयी माहिती होती.

९. **अनेक जिल्ह्यांमध्ये नोंदणी केलेल्या** केसेसची **माहिती बहुते डी.सी.पी.यूस (५७%)** पर्यंत पोहचत नाही**.**

१०. पिडीत मुलांसाठी उपलब्ध असलेल्या जिल्हास्तरावरील सेवा, सुविधा आणि तज्ञांची यादी असलेली "जिल्हा संसाधन निर्दीशिका" (Resource Directory) अधर्वट स्थितीत आहेत. ज्या डी.सी.पी.यूस कडे जिल्हा संसाधन निर्दीशिका/सूची उपलब्ध आहे, त्यांनीही छपाईसाठी निधीची कमतरता असल्यामुळे इतर भागधारकांपर्यंत ती पोहचवली नाही.

११. बह्तेक डी.सी.पी.यूसनी तक्रारी केल्या की **त्यांच्याकडे मर्यादित अर्थसंकल्प आहेत** आणि त्यांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी होण्याआधीच ते राज्यस्तरीय आ.य.सी.पी.एस द्वारा आधीच मंजूर करणे आवश्यक आहे. पोस्कोच्या केसेस हाताळताना पीडित बालकासाठी विशेष तज्ञांना पुरवलेल्या कोणत्याही सेवांसाठी मानधन दिलेले नाही

१२. **(५०%)** डी.सी.पी.यूसनी **समुपदेशन सेवा प्रदान केल्या.** जवळजवळ एक चतुर्थांश अशा समुपदेशकांची नियुक्ती केली गेली ज्यांच्या सेवांचा काही उपयोग केला जात नव्हता. उर्वरित डी.सी.पी.यूसमध्ये समुपदेशक नव्हते.

१३**.** अभ्यासाअंतर्गत हि धक्कादायक लक्षात घेण्यासारखी आहे की **एकाही डी.सी.पी.यूसला पोक्सो (POCSO) नियमांतर्गत त्यांना “सहाय्य व्यक्ती” म्हणून नियुक्त केले जाऊ शकेल ह्या तरतुदीची जाणीव नव्हती.**

१४. **बह्संख्य डी.सी.पी.यूसच्या (८६%)** कर्मचाऱ्यांनी **असा दावा केला आहे की त्यांनी** गृह तपासणी साठी पीडित बालकाच्या घराला भेट दिली असून त्यासंबंधित अहवाल जमा केला आणि पीडितांच्या कुटूंबियांबरोबर कार्य केले व पीडित बालकाला आर्थिक साहाय्य मिळेल याची खात्री केली

१५**. बह्संख्य डी.सी.पी.यूस ने (७१%) त्यांच्या जिल्ह्यातील विविध भागधारकांकरिता जे.जे कायदा आणि पोक्सो कायद्याचे (POCSO) प्रशिक्षण आयोजित करण्याचा दावा केला आहे.**

१६. बहुसंख्य **डी.सी.पी.यूस** ने सांगितले कि पोलीस पोस्कोला समजण्यात त्यांची मदत घेतात. आश्चर्याची बाब म्हणजे पोलिसांनी त्यांच्या मुलाखतीत असे सांगितले आहे की त्यांना त्यांच्या जिल्ह्यातील डी.सी.पी.यूस चे अस्तित्व बद्दलची माहीत नव्हती.

१७. **बहुतेक डी.सी.पी.यूस (७१%)** यांनी असे **सांगितले की, त्यांच्या जिल्ह्यात लहान मुलांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी विशेष उपक्रम राबविले जात आहेत**. ज्यामध्ये बालकांसाठी अनुकूल व मैत्रीपूर्ण सी. डब्ल्यू. सी निर्माण करण्यापासून ते गावांमध्ये VCPC गठन करण्यापर्यंत व वसतिगृहातील मुलांच्या समित्यां तयार केल्या, कायद्यासंबंधित जागरूकता आणण्यासाठी आणि भागधारकांमधील समन्वय प्रणाली तयार करण्यासाठी.

**<u>शिफारसी</u>**

१. डी.सी.पी.यूस ना पोस्को (POCSO) कायद्याच्या अंतर्गत स्वत:च्या भूमिकेबद्दल आणि जबाबदाऱ्यांसंबंधित आणि इतर भागधारकांच्या कर्तव्याबद्दल त्याच्या कमी असलेला जागरूकतेचा स्कोअर चिंतेचे कारण आहे. योग्यरित्या निर्देशित करून, एकत्र राहून कार्य करणे आणि जबाबदारीने सर्व कार्यपद्धती अंमलात आणून हे दुरुस्त करणे आवश्यक आहे.

२. बाल संरक्षणासाठी, जे.जे कायदा तसेच पोक्सो कायद्यामध्ये डी.सी.पी.यूस एक महत्वपूर्ण समन्वय यंत्रणा असतानाही सध्या ती अत्यंत कमी संसाधने आणि दुरावस्था झालेली यंत्रणा आहे. त्यामध्ये कर्मचारी, पायाभूत सोयी आणि इतर स्रोतांच्या दृष्टीने आवश्यक त्या तरतुदी करणे आवश्यक आहे ज्या मुलांच्या संरक्षणासाठी वापरल्या जाऊ शकतात.

३. अभ्यासात नमूद केल्याप्रमाणे सध्या डी.सी.पी.यूस च्या भुमिका व जबाबदा-या याबाबतीत अनेक तरतुदी नाहीत परंतु तरतुदींच्या अभावच नाही तर त्याबद्दलच्या स्पष्टतेचा अभाव देखील आहे. ही परिस्थिती सुधारावी लागणार आहे आणि डी.सी.पी.यूंना त्यांच्या भूमिकेवर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित केले जावे, जसे ते एक समन्वयक आणि पोक्सो व जे.जे कायद्याअंतर्गत काम करणाऱ्या संस्थांसाठी विविध अन्य महत्त्वाच्या बाबींचे पूवणारे सुगम साधक आहेत .

४. डी.सी.पी.यूसचे अस्तित्व आणि भूमिका या जेजे आणि पोकसो(POCSOA)च्या कायद्याच्या अंतर्गत असणाऱ्या इतर भागधारकांना त्यांच्या योग्य उपयोगासाठी माहित असणे आवश्यक आहे.

५. पोक्सोची यंत्रणा आणि डी.सी.पी.यूस यांच्यामध्ये जी स्पष्ट दिसणारी मोठी तफावत तातडीने दूर करणे गरजेचे आहे.

६. पोक्सो (POCSO) कायद्याच्याअंतर्गत डी.सी.पी.यूसने संसाधन निर्देशिका आणि तज्ञांची सूची विविध भागधारकांना प्रदान करणे आवश्यक आहे हे सर्व अर्थसंकल्पीय तरतुदींनुसार असावे आणि संसाधन निर्देशिकांच्या डीजीटायजेशन चा प्रसार करण्यासाठी एक यंत्रणा असावी.

७. डी.सी.पी.यूस मध्ये कायद्याच्या तरतुदींसंबंधित विशेषत: सहाय्य व्यक्ती यांची नेमणूक करण्याच्या तरतूदी आणि पोक्सो (POCSO) अंतर्गत विविध महत्वाच्या तरतुदींविषयी ज्ञानाचा अभाव आहे. पोकसो कायद्याअंतर्गत विविध पदाधिकारी यामधील तफावत दूर करणे आवश्यक आहे.

८. डी.सी.पी.यूस ने अनेक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले असल्याचा दावा केला आहे, पण या प्रशिक्षणाचा कोणताही उल्लेखनीय असा सकारात्मक परिणाम दर्शवत नाही.

## रुग्णालये

**निष्कर्ष**

१. पोक्सो (POCSO) कायदा आणि पोक्सोच्या नियमाअंतर्गत त्यांच्या विशिष्ट जबाबदाऱ्यांबाबत रुग्णालयांमध्ये सरासरी ४३% जागरूकता आहे.

२. **वैद्यकीय तपासणीच्या कायदेशीर बंधनकारक प्रक्रियेसंबंधात रुग्णालयांच्या स्तरावर कोणतीही स्पष्टता आणि समानता नव्हती** उदा. वैद्यकीय तपासणी आणि बालकांसाठी अनुकूल व मैत्रीपूर्ण प्रक्रिया, वैद्यकीय तपासणी साठी संमती इ. पोक्सोच्या पिडीत बालकाच्या वैद्यकीय तपासणीची कार्यपद्धती जसे की वैद्यकीय तपासणी, अहवालाचे स्वरूप, तपासणी करणारे डॉक्टर ( कोण असावेत) ,फॉरेन्सिक किट आणि साधने इत्यादींचा सरासरी सर्व जिल्ह्यांमध्ये तफावत होती.

३. **पिडीत मुलींचा सन्मान आणि गोपनीयतेबद्दल रुग्णालयांमध्ये संवेदनशीलतेची तीव्र कमतरता**,हे संशोधन करणाऱ्या सदस्यांच्या निरीक्षणास आले.

४. **मुख्यतः अंतर्भेदी लैंगिक अत्याचाराच्या पोक्सो आणि बलात्कार (कलम ३७६ आय.पी.सी) अंतर्गत प्रकरणे वैद्यकीय तपासणी आणि उपचारांसाठी रुग्णालयात आणण्यात आली आहेत**. व केवळ खूप कमी प्रकरणांमध्ये, पोक्सो (स्पर्श आणि गैर-स्पर्श गुन्हे) अंतर्गत सर्व प्रकारच्या लैंगिक गुन्ह्यांच्या पीडित बालकाला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात आणले जातात.

५. प्राथमिक आरोग्य केंद्रातील सुविधांची कमतरता आणि महिला वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे, **पोक्सो कायद्याअंतर्गत पिडीत मुलांना जिल्हास्तरावरील रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी आणले जाते.** बऱ्याच वेळेस पोलीस, पिडीताच्या कुटुंबीयांनाच रुग्णालयात अहवाल दाखल करण्यास सांगतात. यामुळे पीडित बालक आणि त्याच्या कुटुंबाची बरीच गैरसोय होते आणि परिणामी गंभीर पुराव्याचे नुकसान होऊ शकते.

६. रुग्णालये अतिरीक्त कामकाजाचे कारण सांगून पोक्सोच्या पिडीत बालकाच्या वैद्यकीय तपासणीत जास्त विलंब करतात. ह्याचे सत्यापन करणे हा यांच्या अध्ययनाचा भाग नाही.

७. रुग्णालयांमध्ये विविध विभागांमधील अभिसरण नसणे हे पोक्सोच्या अंतर्गत कार्य करणाऱ्या विविध भागधारकांच्या कार्यावर परिणाम करणारी एक सामान्य समस्या असल्याचे दिसून येते.

८. **खूपदा पोक्सो कायद्याअंतर्गत पिडीत बालकांना अपघात विभागात आणले जाते**. त्यांना स्त्रीरोग विभाग आणि बाल चिकित्सा विभागांमध्ये सुद्धा नेले जाते.

९. सी.आर.पी.सी अंतर्गत आणि (म्हणून देखील POCSOA मध्ये) नमूद काय आहे या विपरीत, **रुग्णांलयांना असे वाटते कि, रुग्णांलयांचे विशेषतज्ज्ञ जसे स्त्रीरोगतज्ज्ञ आणि फॉरेन्सिक एक्सपर्ट्स यांनीच बाल लैंगिक शोषणाच्या पिडीत बालकांची वैद्यकीय तपासणी करावी.**

१०. वैद्यकीय तपासणीसाठी संमतीच्या वयाबद्दल डॉक्टरांच्या समजेमध्ये विस्तृत फरक असूनही, सर्वानाच हे मान्य आहे की **जर मूल १० वर्षांपेक्षा कमी असेल तर मुलाची तपासणी करण्यासाठी पालकांची संमती आवश्यक आहे**. संभ्रम हा कट-ऑफ च्या वयाबद्दल आहे आणि संमतीसाठी नाही.

११. **डी. एन. ए (DNA) आणि फॉरेन्सिक लॅब (Forensic labs) सारख्या सुविधा केवळ फक्त मुंबईसारख्या काही महानगरांमध्येच असल्याने, राज्याच्या सर्व भागांतून पोक्सो (POCSO) च्या अंतर्गत नमुन्यांना येथे पाठविण्यात येतात ज्यामुळे मुलांच्या वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त होण्यास आणि चार्जशीट दाखल करण्यास गंभीर विलंब होतो.**

१२. मुख्यतः पोलीस विभाग काही प्रकरणांमध्ये विशिष्ट निष्कर्षांबद्दल विचारून वैद्यकीय तपासणीवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. विविध जिल्ह्यांच्या पोलिसांनी सादर केलेल्या मेमोमध्ये कोणतीही एकरूपता दिसून येत नाही, आणि त्यामुळे वैद्यकीय अहवालांमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे.

१३. अलीकडेच "'दोन बोटांची चाचणी' या पद्धतीवर टीका केल्यानंतर बंदी आणली असतानाही लैंगिक गुन्ह्याच्या पिडीत मुलींवर अजूनही ह्याच पद्धतीने वैदयकिय तपासणी केली जात आहे. सर्व रुग्णालयांनी योनीतून झालेल्या दुखापतींची तपासणी करण्याच्या आवश्यकतेच्या आधारावर हे योग्य आहे असे ठरवले.

१४. **प्रभावी वैद्यकीय तपासणी अहवालासाठी पीडित मुलीच्या योनीची लवचिकता व हाईमेन (hymen) च्या स्थितीचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे असे ६९% रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी म्हणाले.**

१५. काही लोकांना अशी भीती आहे कि, अनिवार्य अहवाल (Mandatory Reporting) ह्या कलमाचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. बरेच पोक्सोची प्रकरणे उघडीस येत नाहीत.

१६. **पोक्सो च्या अंतर्गत रुग्णालये आणि इतर यंत्रणेदरम्यान नेटवर्किंगचा गंभीर अभाव आहे.** त्यास ताबडतोब दुरुस्त करणे आवश्यक आहे.

**<u>शिफारसी</u>**

१. पिडीत बालकाच्या गोपनीयतेचे आणि प्रतिष्ठेचे उल्लंघन केल्याबद्दल रुग्णालयांना जबाबदार धरले पाहिजे.

२. वैद्यकीय तपासणीची सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रावर उपलब्ध करणे आवश्यक आहे.

३. रुग्णालयांमध्ये वैद्यकीय तपासणीला विलंब होण्याचे कारण शोधणे आवश्यक आहे.

४. रुग्णालयाच्या स्तरावर कार्यपद्धती सुव्यवस्थित असणे आवश्यक आहे आणि त्यांच्यामधील विसंगतीची उपेक्षा करणे आवश्यक आहे. राज्याने परीक्षांसाठी संमती, अहवाल स्वरूप, चिकित्सक, न्याय चिकित्सा आणि साधने इत्यादींचा अभ्यास यासारख्या विषयांवर राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये एकसारखेपणा आणला पाहिजे.

## नागरी सामाजिक संस्था

## (Civil Society Organisations: सी.एस.ओ)

**<u>निष्कर्ष</u>**

१. पोक्सो कायद्याचे नियम ४ (कलम ७) (साहाय्य व्यक्ती / साहाय्य संस्था तरतूद) ह्या तर्कांसोबत कार्य करतात कि राज्यात सी.एस.ओ आणि एन.जी.ओ हे सर्वव्यापी आहेत आणि सर्व प्रकारच्या मुद्द्यांवर हरप्रकारे काम करण्यास तयार आहेत.

२. ह्या अध्ययनांतर्गत असे दिसून आले कि जवळपास सर्वच सी.एस.ओंनी (९३%) मुलांविरूद्ध लैंगिक गुन्ह्यांचे प्रकरण हाताळले होते.

३. सर्व सी.एस.ओंनी असा उल्लेख केला की ते लैंगिक गुन्ह्यांचे सर्व प्रकरण आधी पोलिसांना कळवतात. तथापि, बहुसंख्य सी.एस.ओंनी असा उल्लेख केला आहे की **ते स्थानिक पोलिसांना याबद्दल माहिती देण्यापूर्वी जवळच्या सी.डब्लू.सीला मुलांविरूद्ध झालेल्या लैंगिक गुन्ह्यांची प्रकरणे नोंदवतात.** हे कदाचित सी.डब्ल्यू.सी शी त्यांची असलेली ओळख व परिचयामुळे असू शकते.

४. चाईल्डलाईनशी संबंधित असलेल्या सी.एस.ओ वगळता इतर कोणत्याही सी.एस.ओस मध्ये मुलांविरूद्ध झालेल्या लैंगिक **गुन्ह्यांची** प्रकरणे हाताळण्यासाठी लेखी प्रोटोकॉल नव्हते.

५. सर्व सी.एस.ओं ना अनेक प्रक्रियात्मक आक्षेपांना तोंड द्यावे लागते जसे सामान्य (एफ.आई.आर नोंदवण्याचा विलंब, मुलांचे अनेक वेळा विधाने नोंदविण्याची प्रक्रिया) आणि सामाजिक -सांस्कृतिक (सामाजिक कलंक आणि लैंगिक शोषणाबद्दल निषिद्ध) आणि आश्रय गृह, समुपदेशन सेवा इ. सारख्या सहाय्य सेवांचा अभाव.

६. सर्व सी.एस.ओंनी उल्लेख केला आहे की त्यांना सी.डब्ल्यू.सी कडून सहाय्य व्यक्ती म्हणून कार्य करण्यास अधिकृत आदेश मिळाला नाही. जरी त्यांनी स्वतःहून पीडित आणि कुटुंबियांना आधार दिला तेंव्हाहि त्यांना औपचारिकपणे सहाय्य व्यक्ती म्हणून नियुक्त केले गेले नाही. हे पोक्सो नियमांच्या अंतर्गत महत्त्वपूर्ण तरतुदीचे प्रचंड अपव्यय सूचित करते.

७. बहुतेक सी.एस.ऑनी (६४%) असा उल्लेख केला कि ते बाल लैंगिक शोषणाच्या पीडित बालकांना न्याय मिळवून देताना, न्यायचौकशीपूर्वक न्यायचौकशीच्या टप्प्यात एक महत्वपूर्ण भूमिका निभावतात.

८. सर्व सी.एस.ऑनी अनिवार्य अहवाल (Mandatory Reporting) या तरतुदीचे कौतुक केले परंतु सध्याच्या सर्वसमावेशक तरतुदी तरतुदीचा फायदा आहे का हे पडताळून पाहण्याची गरज असल्याचे नमूद केले.

९. सर्व सी.एस.ऑनी हे स्पष्ट केले की लैंगिक गुन्ह्यातील बालकास मदत करण्यासाठी त्यांच्या जिल्ह्यांमध्ये असलेल्या कोणत्याही विशेष उपक्रमांची त्यांना माहिती नव्हती.

**<u>शिफारसी</u>**

१. कायदे, धोरणे आणि कार्यक्रम तयार करतांना, कायदा निर्मात्यांनी व सार्वजनिक प्रशासकांनी असा अंदाज लावू नये की; सी.एस.ओ देशातील व राज्यातील सर्व भागांमध्ये उपस्थित आहेत. सर्व सी.एस.ओ एकसमान पार्श्वभूमी, संसाधन आधार आणि जनादेश वर कार्यरत आहेत असा अंदाज लावू नये. त्यांची उद्दिष्टे आणि कार्यक्षेत्रे एकसमान आहेत व ते सर्व राज्याद्वारे नेमलेल्या कामास पूर्ण करण्यास तयार आहेत असे समजू नये.

२. बऱ्याच सी.एस.ऑं.नी नमूद केल्या प्रमाणे त्यांनी पोक्सोची प्रकरणे हाताळली आहेत. ते महत्वाचे तज्ञ ठरू शकतात आणि जेथे शक्य असेल तेथे त्यांचे कौशल्य पणाला लावले पाहिजे, हे प्रयत्न मनापासून झाले पाहिजे.

३. इतर भागदारकांच्या तुलनेने सी.एस.ऑं मध्ये कायद्याचे नियम आणि मुलांच्या उत्तम हिताची चांगली समज आहे. न्याय व्यवस्थेचा समावेश आणि मुलांचे सर्वोत्तम हित करण्यासाठी त्यांनी अंमलात आणलेल्या चांगल्या कार्यपद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे आणि शक्य तितक्या प्रत्येक प्रकारे पोक्सोच्या चांगल्या अंमलबजावणीसाठी याचा वापर करण्यात यावा.

४. पोक्सो कायद्यामध्ये सहाय्य व्यक्तीची नेमणुकीची तरतूद अतिशय निर्णायक आहे. हे दुर्दैवी आहे की हे कायद्याच्या मजकूरात नाही परंतु नियमांचा एक भाग आहे आणि, जरी योग्य सहाय्य व्यक्ती त्यांच्या न्यायालयीन कक्षेत आढळली तरी, ही तरतूद सी.डब्ल्यू.सी तर्फे वापरली जात नाही. हे सी.एस.ओ आधीपासूनच बालकास मदत करण्यास सहभाग घेत आहेत आणि अद्याप संबंधित प्रकरणांमध्ये सहाय्य व्यक्ती म्हणून त्यांना नियुक्त केलेले

नाहीत.  हे स्वीकारता येत नाही कारण  यांपैकी बरेचसे सी.एस.ओ सहाय्य व्यक्ती म्हणून त्यांच्या सहाय्यासाठी कोणत्याही खर्चाची अपेक्षा देखील करत नाहीत.

५. वस्तुस्थिती लक्षात घेता;  सी.एस.ओ मध्ये स्वैच्छिकतेची भावना असते तसेच विविध व अभिभावक प्रकृती असते, ते त्यांच्या कामकाज समजुतीच्या आणि शैलीच्या बाबतीत वेगळे असतात. पोक्सो (POCSO) बळकट करण्याच्या अंमलबजावणीमध्ये त्यांच्या चांगल्या एकात्मतासाठी उपयोगी राजशिष्टाचार आणि एस.ओ.पी (Standard Operating Procedures) विकसित केले पाहिजेत.

६. सी.एस.ओं च्या क्षमतेच्या बांधणीसाठी ही प्रयत्न केले पाहिजेत आणि चांगल्या बाल संरक्षणासाठी पोस्को (POCSO) वर काम करणा-या सी.एस.ओं च्या  कार्यास आणि कार्यान्वयनास प्रत्येक पैलूमध्ये मदत देण्यात यावी.

## राज्यासाठी शिफारशी

१. आरोग्य विभाग, गृह विभाग आणि महिला व बाल कल्याण विभागांना पोक्सोच्या अंतर्गत पीडित व कुटुंबिय यांच्याशी संबधीत प्रक्रिया आणि आकलनामध्ये एकसारखेपणा आणण्यासाठी एकत्रिकरण करणे व एकजूट होऊन ह्या विषयावर काम करणे आवश्यक आहे.

२. मुलांचा जबाब पोलीस ठाण्यात घेतला जातो हे सध्या प्रचलित सामान्य पद्धत आहे. पोस्को कायदा कलाम २४. स्पष्टपणे नमूद करते की पिडीत मुलाचा जबाब मुलाच्या निवासस्थानावर किंवा त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी घेतला जाऊ शकते. पुलिस स्टेशन मुलांसाठी पसंतीची जागा असण्याची संभावना कमी आहे, जरी पोस्को स्पष्ट रूपाने असे सांगत नाही कि मुलांचे जबाब पोलीस स्टेशन मध्ये दाखल करू नये, परंतु कायद्याने हेच सुचविले आहे. पीडित मुलांचे जबाब पोलिस स्टेशनमध्ये नोंदवता कामा नये असे राज्य सरकारने औपचारिकरित्या स्पष्ट करावे.

3. सी.डब्ल्यू.सी असे मानतात आणि अपेक्षा करतात की पोलिसांनी त्यांच्यासमोर पोक्सो (POCSO) च्या अंतर्गत प्रत्येक प्रकरण सादर करावे. पोक्सो (POCSO) आणि नियमांचा मजकूर तसे सांगत नाही. सी.डब्ल्यू.सी शी त्यांचा काहीही संबंध नाही असे पोलिसांनी सांगितले आहे. या दोन भागधारकांमध्ये अंतर आणि गैरसमज होण्याची एक परिस्थिती दिसते आहे. राज्याने या दोन्ही भागधारकांना या मुद्द्यावर कायद्याचे स्थान स्पष्ट करणे आवश्यक आहे.

४. राज्याने पोक्सो च्या अंतर्गत पिडीत मुलांच्या वैद्यकीय तपासणीस स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे आवश्यक आहे, जेणेकरून वैद्यकीय परीक्षणादरम्यान घेण्यात येणारी पावले आणि कोणत्या अटी पूर्ण कराव्यात हे स्पष्ट होईल. खालील घटकांची स्पष्टता आवश्यक आहे;

- वैद्यकीय तपासणीसाठी संमती देण्याचे वय
- सहमती ची अनिवार्यता. विशेष रूपात पिडीत मुलांच्या आणि विधी संघर्षित मुलांच्या सहमती ची अनिवार्यता.
- जर पिडीत मुलगा १२ ते १८ वर्षाचा असेल, तर चिकित्सा संस्थानद्वारे नियुक्त महिला प्रतिनिधींची अनिवार्य उपस्थिती.

५. कोणतीही महिला चिकित्सक उपलब्ध नसल्यास प्रस्थापित कायदेशीर नियमांनुसार एखाद्या स्त्रीची (किंवा लहान मुलीची ) वैद्यकीय तपासणी कोणत्याही नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी (पुरुष किंवा स्त्री) करू शकतात, परंतु पोक्सो कलम २७ (२) मध्ये नमूद केल्यानुसार,"जर पिडीत मुलगी असेल, तर वैद्यकीय तपासणी एका स्त्री चिकित्सकानेच केली पाहिजे" असे म्हटले आहे, या तरतुदींबद्दल संभ्रमण दूर करणे आवश्यक आहे.

६. डी. एन. ए (DNA) आणि फॉरेन्सिक लॅब (Forensic labs) सारख्या सुविधा केवळ मुंबईसारख्या महानगरांमध्येच आहेत, ज्यामुळे मुलांच्या वैद्यकीय तपासणी अहवाल आणि चार्जशीट दाखल करण्यास गंभीर विलंब होतो. राज्याने डी.एन.ए आणि फॉरेन्सिक लॅब (Forensic labs) सारख्या सुविधा सहज आणि त्वरित उपलब्ध केल्या पाहिजेत.

७. पोक्सोमधील तरतुदी आणि पोक्सोच्या अंतर्गत तयार केलेल्या इतर विविध भागधारकांचे कर्तव्य व कार्य समजून घेण्यात स्पष्ट अभाव आहे. प्रत्येक स्वतंत्र भागधारकांसाठी प्रशिक्षण न करता, बहुस्तरीय भागधारक आणि कर्तव्य पदाधिकारी यांच्यामध्ये संयुक्त प्रशिक्षण आणि संवेदीकरण करणे गरजेचे आहे. असे केल्याने पोक्सोच्या संबंधात इतर भागधारक आणि कर्तव्य धारकांच्या उपस्थिती, भूमिका आणि जबाबदार्यांबद्दल अधिक चांगली समज निर्माण होईल.

८. मुलांच्या मित्रत्वाची भावना आणि गुणोत्तर, कार्यपद्धती आणि पद्धतींमध्ये आणण्या करिता विस्तृत राजशिष्टाचार, एस.ओ.पी (Standard Operating Procedures), हस्तपुस्तिका, कामाची यादी, प्रशिक्षण कार्यक्रम आणि आरेखिय अभ्यासक्रमांद्वारे व्यापक प्रमाणीकृत आणि मुख्य प्रवाहात असणे आवश्यक आहे.

९. जिल्हा पातळीवर सहयोगी बहू- भागधारक रचना तयार करण्याची एक अतिमहत्त्वाची गरज आहे ज्यामुळे पोक्सो अंतर्गत काम हाताळणे हे प्रत्येक भागधारकाला सोप्पे जाईल.

१०. विविध न्यायालयांनी दिलेल्या संबंधित निर्णय, पोक्सो प्रशिक्षण सामग्रीमध्ये कर्तव्य धारकांसाठी एकीकृत केले जावे.

११. सी.एस.ओ आणि सध्याच्या सरकारी भागधारकांच्या सहकार्याने बहुतांश जिल्ह्यात बाल संरक्षणासाठी विविध उपक्रम सुरू करण्याची गरज आहे.

१२. अभ्यासातील बहुतेक भागधारकांनी असे मत मांडले की लैंगिक संबंधासाठी संमतीचे वय १८ वर्षे कायम ठेवली जाऊ शकते, या तरतुदीची सरसकट वापर न करता त्याची योग्यता

पाहणे गरजेचे आहे. १६ ते १८ या वयोगटाबद्दल व त्यांच्या गरजांबद्द्ल विशेष तज्ञांनी अभ्यासाची गरज आहे. १६ ते १८ या वयोगटातील व्यक्तींचे गुन्हेगारीकरण करण्याऐवजी त्यांच्यासाठी विशेष तरतुदींची गरज आहे.

१३. 'कायद्यामध्ये अनिवार्यपणे अहवाल (Mandatory Reporting) देणे बंधनकारक असावे' असे बहुतांश भागधारकांनी सांगितले. परंतु हे मत अतिशय प्रासंगिक आणि अविकसित आढळून आले. कारण कोणताही पुरावा जसे अनिवार्यपणे अहवाल (रिपोर्ट) न केल्याने, दाखल केलेल्या गुन्ह्याची माहिती ते पुरवू शकले नाहीत.

१४. पोस्को मध्ये अनिवार्य अहवाल (Mandatory Reporting) देण्याची तरतूद एक अतिशय विवादास्पद तरतूद आहे आणि विविध भागधारकांचे त्यावर भिन्न मत आहे. त्याच्या वास्तविक आणि भयभीत प्रतिउत्पादक प्रभावांसह कोणत्याही प्रकारची तरतूद न करता ही तरतूद अंमलात आणू नये. त्याचप्रमाणे, हे पूर्णपणे निष्कर्ष काढणे हा हि एक उपाय नाही. या तरतुदीचा अधिक वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणे, तंतोतंत आणि तुलनात्मकरीत्या प्रयोग करणे आणि काही वर्षांपासून ते अंमलात आणणाऱ्या इतर राष्ट्रांच्या अनुभवांची माहिती घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१५. पोलीस प्रकरण टाळण्यासाठी पीडित मुलीचे कुटुंबीय तिच्या गर्भधारणे विषयी माहिती देत नाहीत. जेव्हा त्यांना अशी शक्यता वाटते तेव्हा ते रुग्णालयाच्या संपर्कातून बाहेर पडतात. परिणामी, रुग्णालयेने पालकांच्या दबावाखाली अशा प्रकरणांची तक्रार करणे बंद केले आहे. ही परिस्थिती अनिवार्य अहवालाच्या तरतुदीत फेरबदल करून संबोधित केले पाहिजे. अनिवार्य अहवाल देण्याची तरतूद त्वरित सुधारित केली जाणे आवश्यक आहे आणि त्याची नकारात्मक क्षमता नष्ट करून उपयुक्त बनविणे आवश्यक आहे.

# प्रशिक्षण

## निष्कर्ष

पोलीस, सी.डब्ल्यू.सी, जे.जे.बी यांसारख्या प्रतिसादकांनी पोक्सो वर काही प्रशिक्षण घेतले असले तरी मुख्यतः त्यांनी हे मान्य केले की हे प्रशिक्षण पुरेसे नाही आणि ह्या प्रशिक्षणांनी त्यांना क्षेत्रातील पोक्सोच्या प्रकरणांची हाताळणी करण्यासाठी सुसज्ज केले नाही.

पोक्सो हा अपवादात्मक कायद्यांपैकी एक आहे. ह्या कायद्याचे इतर बर्याच कायद्याशी व त्यांच्या कायदेशीर वातावरणाशी संवाद होतो ज्यामध्ये आय. पी. सी, सी. आर. पी. सी, जे. जे. ऍक्ट, द ईमॉरल ट्रॅफिक प्रिव्हेंशन ऍक्ट, बाल मजदूर ( प्रतिबंधन आणि नियमन) कायदा, बाल विवाह प्रतिबंध कायदा, प्रिव्हेंशनऑफ बेगरी ऍक्ट १९५९, मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेगनन्सी ऍक्ट इ. कायदे आहेत. भागधारकांना पॉक्सोवरील प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम करतांना पॉक्सो कायद्याचा बाकीच्या कायद्यांशी होणारा सवांद त्यांना समजला पाहिजे.

ज्ञानी व्यक्तींशी चर्चा, भागधारकांबरोबर गट चर्चा, आणि दुय्यम डेटा दर्शवितो की:

- कोणत्याही प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात तज्ञांचे किंवा राज्याने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाचे पालन केलेले नाही.
- प्रशिक्षण कार्यक्रमांची कालावधी कोणत्याही मान्यता प्राधिकरणाकडून सुचविण्यात आली नव्हती किंवा मंजूर करण्यात आली नाही. प्रशिक्षण कार्यक्रमांची कालावधी हे १ तास ते दोन दिवसांच्या यादृच्छिकपणे भिन्न होते.
- तज्ञ व्यक्तींचे (Resource Persons) कौशल्य लक्षात घेतांना किमान मानकांचे पालन केले जात नाही. प्रशिक्षण देणारे तज्ञ व्यक्ती हे नुकतेच पदवीप्राप्त व्यक्ती, पोलीस, सी.एस.ओ मध्ये एक ते पाच वर्षाचे अनुभव असलेले असे विविध तज्ञ व्यक्ती प्रकारचे होते.
- कधीकधी प्रशिक्षण देणारे तज्ञ व्यक्ती हे सामाज कार्य, कायदा, सी.एस.ओ विभाग, वैद्यक यासारख्या क्षेत्रांतील अत्यंत विद्वान असतात व त्यांचे सत्र फार शैक्षणिक लाभाचे असते. बऱ्याचदा त्यांना खराब पद्धतीने चित्रित केलेले आणि प्रशासित कार्यक्रमाचा एक भाग म्हणून एक तासाचे सत्र दिले जाते. जसे की, प्रशिक्षण

कार्यक्रमातील एकंदर चित्रांमध्ये अशा वक्त्यांचा समावेश असूनही व्यावसायिकता आणि उत्तरदायित्व नसल्यानं प्रशिक्षण कार्यक्रम आवश्यक तो प्रभाव पाडण्यात अयशस्वी होतो.

- वापरले जाणारे प्रशिक्षण आणि संप्रेषण पद्धतींसाठी  किमान मानकांचे पालन केले जात नाही.
- प्रशिक्षणार्थींचा गटांचा निर्णय घेण्यात संपूर्ण ताठरपणा दिसून येतो. भगदरकांच्या श्रेणीनुसार प्रशिक्षण गट तयार केले जातात. तळागाळात पोक्सो प्रकरणात काम करताना प्रत्येक भागदाराकला दुसऱ्या भागदारकाशी एकत्रित येऊन काम करण्याची गरज आहे. परंतू पोक्सो संबंधीत प्रशिक्षण हे नेहमीच भगदरकांच्या वैयक्तिक गटांमध्ये होत असून, भगदरकांच्या मिश्र गटास प्रधान केले जात नाही.
- प्रशिक्षण घेणाऱ्या कोणत्याही  राज्य किंवा गैर सरकारी संस्थांनी पार्श्वभूमी साहित्याचा एक मानक संच, किंवा केस सामग्री  प्रशिक्षणार्थींसाठी विकसित केली नव्हती.
- प्रशिक्षणाआधी आणि प्रशिक्षणानंतर कोणतेही मानक किंवा एकसमान मूल्यमापन झाले नाही.
- पोक्सोवर प्रशिक्षण याचा अर्थ किमान कायद्याचा महत्वाच्या तरतूदी मांडणे असे ग्राहय धरले गेले आहे.
- पोक्सोच्या केंद्रीय मुद्द्यांशी घनिष्ठ संबंध असलेले विषय जसे बाल लैंगिक छळ, मुलांचे विरुद्ध हिंसा, बाल संरक्षण, लिंग हिंसा इत्यादी  व्यापक विषयांचा प्रशिक्षणामध्ये समावेश नव्हता.
- संशोधनाद्वारे सत्यापित केलेले संसाधन प्रशिक्षणात वापरल्याचे दिसून आले नाहीत. भारत सरकारच्या २००७ अभ्यासाच्या काही धक्कादायक आणि सनसनाटी आकडेवारी अजूनही वापरली जाते.
- प्रशिक्षण कार्यक्रमांचा पाठपुरावा घेतला जात नाही आणि त्यांच्यात निरंतरता नाही. काही कर्तव्य पदाधिकारी जे  प्रशिक्षणाच्या कार्यक्रमात उपस्थित असतात ते  प्रशिक्षकांची संपर्क माहिती घेण्यास पुढाकार घेतात, जेव्हा त्यांना कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रकरणात सामोरे जावे लागते तेव्हा ते त्यांच्याशी संपर्क साधतात.

**<u>शिफारसी</u>**

१. अध्यापन पूर्व  आणि सेवांतर्गत प्रशिक्षणाला महत्त्व दिले पाहिजे.

२. राज्याने  प्रशिक्षणात जास्तीतजास्त हस्तक्षेप करू नये किंवा विषयावर प्रशिक्षण देणाऱ्या राज्य आणि गैर-राज्यीय संस्थांवर कठोरपणे एक विशिष्ट अभ्यासक्रम आणि स्वरूप लादू नये.

३. जे पोक्सो आणि इतर संबंधित समस्या संदर्भात प्रशिक्षण घेण्यास तयार आहेत आणि ज्यांच्यावर हे कार्य सोपविले आहे त्यांच्यासाठी प्रामुख्याने, राज्याने, सी.एस.ओ आणि अन्य तज्ज्ञांच्या सहकार्याने: प्रशिक्षण सामग्री, पद्धती आणि संसाधन व्यक्तींसाठी  किमान पातळीचे  नियमावली विकसित करून प्रसारित करणे आवश्यक आहे. या नियमावली मध्ये पार्श्वभूमीची  माहिती, परिस्थितीचे विश्लेषण, अभियोग सामग्री, चाचणी पूर्व आणि चाचणी नंतर मूल्यमापन स्वरूप, किमान कालावधी, संप्रेषण तंत्रज्ञान, ऑडिओ व्हिज्युअल इत्यादीचा वापर करण्यासाठी प्रशिक्षक आणि प्रशिक्षण संस्था तयार करणे आवश्यक आहे.

४. एस.जे.पी.यूचे कर्मचारी, सी.डब्ल्यू.सीचे सदस्य आणि जे.जे.बीचे सदस्य, जे.जे संस्थांचे अधीक्षक, वसतिगृहातील रक्षक, मान्यताप्राप्त सेवा प्रदाते यांना पोक्सो कायदा , नियम, बाल संरक्षणाच्या समस्यांसाठी आणि व्यापक मुद्द्यांवरील ऑनलाईन चाचणीसाठी उपस्थित राहणे आवश्यक  पाहिजे.

५. प्रस्तावित ऑनलाईन परीक्षेत त्यांच्या कार्यप्रदर्शनास प्रभावी प्रोत्साहन आणि निर्बंध जोडला जावा.

६. कर्तव्य धारकांच्या वेगळ्या वर्गांच्या तुलनेत बहु-कर्तव्य पदाधिकार्यांना  प्रशिक्षण दिले पाहिजे.

७. प्रशिक्षणाने काळजीपूर्वक निवडलेल्या प्रकरणाची सामग्री वापरुन त्यावर भर दिला पाहिजे जेणेकरुन प्रशिक्षणार्थींना प्रत्येक प्रकरणात विविध कायदेशीर आणि कार्यक्रमविषयक तरतुदी लागू करता येतील.

८. सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, पोलीस, न्यायालयीन अधिकारी, सी.डब्लू.सी / जे.जे.बी सदस्य, वसतिगृहे रक्षक इत्यादींच्या  व्यावसायिक प्रशिक्षणासाठी अभ्यास आणि प्रशिक्षण सामग्रीमध्ये पोस्को, बाल लैंगिक शोषण आणि उपरोक्त विषयांशी संबंधित अभ्यासक्रमांचा समावेश करावा.

९. प्रशिक्षण देणाऱ्या राज्य आणि गैर सरकारी संस्थानची प्रशिक्षण क्षेत्रातील जबाबदारी वाढवली पाहिजे.

१०. राज्याने प्रशिक्षक म्हणून काम करणाऱ्या तज्ञांचा एक समूह तयार करावा, जे कधीकधी गरजेच्या वेळी क्षेत्रातील कर्तव्य धारकांना परामर्श व मार्गदर्शन उपलब्ध करून देऊ शकतील.

aarambh India

An Initiative by Prerana & ADM Capital Foundation

aarambhindia.org

प्रेरणा

PRERANA

ADM CAPITAL FOUNDATION